गृह (परिवहन) विभागामध्ये ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांच्या सेवेच्या कालावधीस मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-१२१२/प्र.क्र.७४/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १२ एप्रिल २०१८

वाचा :

१) माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा शा. नि. क्र. GAD/मातंस ०८०/४/२०१४-O/O Directorate of IT (MH), दि.०१.०७.२०१४, दि.१९.०७.२०१७, दि.०९.१०.२०१७, दि.०४.०१.२०१८ व दि.२०.०३.२०१८

२) शासन निर्णय क्रमांक दि.०१.०१.२०१६, दि.३०.१२.२०१६, दि.२८.१२.२०१७ व दि.१९.०१.२०१८.

प्रस्तावना :

मोटार वाहन विभागातील ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या संदर्भ क्र. १ वरील दि.०१.०७.२०१४ च्या शासन निर्णयानुसार मे.के.पी.एम.जी. प्रा.लि. या संस्थेच्या २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ तांत्रिक सल्लागारांची संदर्भाधीन क्र. २ च्या दि.०१.०१.२०१६ व दि.३०.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.२०.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित निविदा प्रक्रिया राबवून आणि उच्च स्तर सचिव समितीच्या मान्यतेने ५ वर्षाच्या कालावधीकरिता ६ कंपन्यांना प्राधिकृत (Empanelled) केले आहे. त्यामध्ये मे.के.पी.एम.जी. या कंपनीचाही समावेश आहे. मोटार वाहन विभागातील ई-गव्हर्नन्स अंतर्गत असलेले फ्लॅगशिपचे प्रकल्प हे प्रत्यक्ष अंमलबजावणी करावयाच्या टप्प्यावर असल्याने सदर कामासाठी मे.के.पी.एम.जी. कंपनीमार्फत नियुक्त केलेल्या २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ सल्लागारांच्या सेवा दि.३०.०६.२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ सल्लागारांच्या सेवेचा कालावधी वाढवून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मोटार वाहन विभागात ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी नियुक्त केलेल्या मे. के.पी.एम.जी. प्रा.लि. या संस्थेच्या २ वरिष्ठ व ५ कनिष्ठ सल्लागारांच्या सेवेचा कालावधी दि.०१.०७.२०१८ ते दि.३०.०६.२०१९ पर्यंत वाढवून देण्यास आणि या कालावधीसाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.२०.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक महिना प्रत्येक व्यक्तीसाठी विहीत केलेल्या मासिक दराने (सर्व करांसहीत) विहीत अटी व शर्तींच्या अधिन राहून वेतन देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या शा.नि.क्र.GAD/मातंस ०८०/४/२०१४-O/O Directorate of IT (MH), दि.२०.०३.२०१८ मधील अटी व शर्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१२१५४१४६६३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.04.12 15:44:51 +05'30'

(द. ह. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षक)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. उप सचिव (माहिती व तंत्रज्ञान संचालनालय), सा.प्र.वि.मुंबई
८. उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवड नस्ती (परिवहन-४).